# धनुष्यबाण : ना शिंदे गटाला, ना ठाकरे गटाला




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड





www.surajyadigital.com | रविवार, दि. ९ ऑक्टोबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# इंटरनॅशनल मनी ट्रॅफिकिंग आले उघडकीला, लोनॲपने वळवला भारताचा पैसा दुबईमार्गे चीनला

✔ सुराज्य/ॲड.राजकुमार नरुटे

**लोन ॲपच्या माध्यमातून देशभरातील अनेकांना लुबाडणाऱ्या सोलापुरातील धीरज पुणेकर टोळीला पुणे पोलिसांनी बेड्या ठोकताच या टोळीचे कनेक्शन चीनपर्यंत पोहचल्याचे उघडकीस आले आहे. लोनॲपच्या माध्यमातून भारतातून गोळा झालेला पैसा दुबईमार्गे चीनला पोहचवणारी इंटरनॅशनल मनी ट्रॅफिकिंगची भली मोठी साखळी पुणे पोलिसांच्या हाती लागली आहे. मात्र दुबईमध्ये तळ ठोकलेल्या किंग आणि लेमन या चीनच्या इंटरनॅशनल चिटर्सना पकडण्याचे भलेमोठे आव्हान आता पुणे पोलिसांसमोर निर्माण झाले आहे.**



दुबईस्थित किंग आणि लेमन या चिनी चिटर्सच्या जोडगोळीने दुबईत बसून धीरज पुणेकर याच्या टोळीसारख्या आणखी काही टोळ्या ऑपरेट करण्याचा उद्योग सुरू केला आहे. या उद्योगातून गोळा झालेली कोट्यवधींची रक्कम दुबईमार्गे चीनला पळवण्याचे काम या जोडगोळीने आत्तापर्यंत केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. दरम्यान, सोलापुरातील धीरज भारत पुणेकर(वय ३६, रा. संजयनगर, कुमठानाका, घर नं. ७५, सोलापूर) आणि स्वप्निल हनुमंत नागटिळक (वय २९, सध्या रा. पापारामनगर, विजापूर रोड सोलापूर, मूळ रा. विजापूर नाका झोपडपट्टी नं.२, चाँदतारा मशिदसमोर, सोलापूर) यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून त्यांच्यावतीने ॲड.मृणाल कांबळे यांनी काम पाहिले.

**दुबईस्थित किंग व लेमन कोण? पुणेकरच्या घरझडतीत काय घबाड सापडले?**


**वाचा उद्याच्या अंकात...**


## पुणेकर टोळीचे काम

सोलापुरातील धीरज पुणेकर याने तयार केलेली टोळी सामान्य मजूर, कामगार यांना कामाचे आणि पैशाचे आमिष दाखवून त्यांच्या नावाने विविध बँकांमध्ये चालू व बचत खाते उघडण्याचे काम करत होती. या बँक खात्यांना मात्र या टोळीतील सदस्यांचे मोबाईल नंबर लिंक केले जायचे. खाती काढल्यानंतर संबंधित खात्याचे पासबुक, चेकबुक, एटीएम कार्ड, इंटरनेट बँकिंग आयडी, पासवर्ड ताब्यात घेणे संबंधित खातेदारांच्या नावे मोबाईल सीम कार्ड खरेदी करून ते इंटरनॅशनल टोळीला पुरवण्याचे काम पुणेकर टोळीकडे देण्यात आले होते.

## बेंगलोरच्या टोळीचे काम

बेंगलोरच्या टोळीकडे कॉलसेंटर चालवण्याचे काम देण्यात आले होते. या टोळीतील सदस्य बेंगलोरच्या कॉलसेंटरमध्ये बसून व्हॉटस्ॲप कॉल व मेसेज करून कर्जदारांना धमकावत होते. विशेषत: कर्जदारांच्या घरातील महिलांना धमकावून त्यांच्याकडून विविध बँक खात्यांमध्ये पैसे भरून घेतले जात होते. जर कर्जदारांनी पैसे नाही भरले तर त्यांच्या फोटोंचे मॉर्फिंग करून अश्लील चित्रफीत आणि मजकूर बनवून तो कर्जदाराच्या मोबाईलमधील काँटॅक्टलिस्टमधील नंबरवर व्हायरल करण्याचे काम या टोळीकडे सोपवण्यात आले होते.

## यूपीमधील टोळीचे काम

या संपूर्ण गुन्ह्यात आणखी एक टोळी सक्रिय असून ती उत्तर प्रदेशातील आहे. कर्जदारांनी कर्ज घेतल्यानंतर बेंगलोरच्या कॉलसेंटरमधून त्यांना सोलापूरच्या टोळीने दिलेल्या बँक खात्यांमध्ये पैसे भरण्यास धमकावले जायचे. कर्जदारांनी भरलेले पैसे काढून ते दुबईला पोहचवण्याचे काम उत्तर प्रदेशमधील या टोळीकडे सोपवण्यात आल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली आहे. मात्र ही टोळी अद्याप पोलिसांच्या हाती लागली नाही.

# निवडणूक आयोगाने धनुष्यबाण गोठवला

✔ सुराज्य/मुंबई

**अंधेरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे अधिकृत चिन्ह धनुष्यबाण निवडणूक आयोगाने गोठवले असल्याने आता अंधेरी पोटनिवडणुकीसाठी हे चिन्ह शिंदे आणि ठाकरे यांना वापरता येणार नाही. तसेच, शिवसेनेच्या नावाचाही वापर करता येणार नाही.**

निवडणूक आयोगाची शनिवारी चार तासांची बैठक दिल्लीत पार पडली. या बैठकीनंतर चिन्ह आणि नाव गोठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, हा निर्णय तात्पुरत्या स्वरुपाचा आहे. येत्या काळात निर्णय बदलला जाऊ शकतो.

निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वात ही बैठक झाली. या बैठकीत शिवसेनेचा धनुष्यबाण ठाकरे की शिंदे गटाला मिळणार यावर चर्चा झाली. शिंदे गटाने अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीसाठी उमेदवार जाहीर न केल्याने पक्षाच्या चिन्हाबाबत तत्काळ सुनावणी घेऊ नये अशी मागणी ठाकरे गटाकडून करण्यात आली होती. तर, याप्रकरणी तत्काळ सुनावणी व्हावी अशी मागणी शिंदे गटाकडून करण्यात आली होती. शिवसेनेने ७०० पानी लेखी निवदेन निवडणूक आयोगाकडे सादर केले. तर, एकनाथ शिंदे यांनी कालच कागदपत्र सादर केली होती. चार तास बैठकीनंतर अंधेरी पोटनिवडणुकीपुरते शिवसेनेच्या दोन्ही गटांना शिवसेनेच्या नावाचा आणि चिन्हाचा वापर करता येणार नाही. नव्या चिन्हासाठी सोमवारी, १० ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजेपर्यंत आयोगाला पर्याय द्यायचे आहेत. निवडणूक आयोगाने शिंदे आणि ठाकरे गटाला पक्ष आणि चिन्हासंबंधित सर्व पुरावे सादर करण्यासाठी तसेच आपले म्हणणे मांडण्यासाठी शुक्रवार ७ ऑक्टोबरपर्यंतची मुदत दिली होती.

त्यानुसार शिंदे गटाकडून अतिशय शेवटच्या क्षणी काही कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्र निवडणूक आयोगाला सादर करण्यात आले, तर ठाकरे गटाने मुदतवाढ देण्याची मागणी केली. ठाकरे गटाची ही मागणी मान्य करीत निवडणूक आयोगाने कागदपत्रे सादर करण्यासाठी शनिवारी दुपारी २ वाजेपर्यंतची मुदत देण्यात आली. ठाकरे गटाने आज दोन वाजेपर्यंत महत्त्वाचे कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्र सादर केली.

## ■ शिंदे गटाच्या प्रतिज्ञापत्रात काय?

विधिमंडळात असलेल्या शिवसेनेच्या एकूण सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्य आपल्या सोबत असल्याचा दावा शिंदे गटाने केला आहे. प्रतिनिधी सभा आणि राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत एकनाथ शिंदे यांची शिवसेनेचे मुख्य नेता' तसेच अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाचे १४४ पदाधिकारी आणि ११ राज्यांच्या प्रमुखांनी शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. या दाव्याची पुष्टी करण्यासाठी शिंदे गटाच्या वतीने ५५ पैकी ४० आमदार आणि १९ पैकी १२ खासदारांसह लाखो प्राथमिक सदस्यांची प्रतिज्ञापत्रे निवडणूक आयोगाला सादर करण्यात आली आहेत. शिवसेनेच्या बहुसंख्य लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या मुख्य नेतेपदी तसेच अध्यक्षपदी निवड केली असल्याने पक्षाचे धनुष्यबाण हे चिन्ह आम्हालाच मिळाले पाहिजे, असा अर्ज शिंदे गटाकडून निवडणूक आयोगाकडे करण्यात आला होता. सोबतच ठाकरे गटाकडे पुरेसे समर्थन नसतानाही पोटनिवडणुकीत त्यांच्याकडून धनुष्यबाण चिन्हाचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याने यावर लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी शिंदे गटाकडून करण्यात आली होती.

## ■ ठाकरे गटाचा दावा काय?

पक्ष आणि चिन्हांसंबंधीचे पुरावे सादर करण्याकरता आम्हाला कमी वेळ मिळाला असं म्हणत ठाकरे गटाने आज दुपारी दोन वाजता कागदपत्रे सादर केली. यामध्ये विधानसभेतील १४ आमदार, विधानपरिषदेतील १२ आमदार, लोकसभेतील सात खासदार, राज्यसभेतील ३ खासदार, राष्ट्रीय कार्यकारिणीतील १६० सदस्य, १८ राज्य प्रभारी, १९२ जिल्हाप्रमुख, ६०० उपजिल्हाप्रमुख अशी आकडेवारी ठाकरेंनी सादर केली आहे. तसंच, अंधेरी पूर्व येथील पोटनिवडणुकीत शिंदे गटाकडून उमेदवार जाहीर केला नसल्याने या प्रकरणी तातडीने सुनावणी करण्याची गरज नाही, असा दावा ठाकरे गटाने केला होता. केवळ भाजपला फायदा व्हावा म्हणून एकनाथ शिंदेंनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवले, परंतु तात्काळ सुनावणीची गरज नसल्याचे ठाकरेंचे म्हणणे आहे. तसंच, एकनाथ शिंदे यांनी स्वतःला मुख्य नेता पदावर नेमलं आहे. मात्र, असे पद शिवसेनेच्या घटनेत नाही. त्यामुळे चिन्हाबाबतचा दावा पक्षप्रमुखांच्या परवानगीविना होऊ शकत नाही, असं ठाकरे गटाने निवडणूक आयोगासमोर मांडलं होतं.

# झाडाची फांदी तोडताना शॉक बसून एकाचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

झाडाची फांदी तोडताना विद्युत वाहिनीच्या शॉक बसल्याने ४५ वर्षीय इसम मरण पावले. ही घटना रानमसले (ता. उत्तर सोलापूर) येथे आज शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.

राजेंद्र भगवान कांबळे (वय ४५ रा. वडाळा ता.उ.सोलापूर) असे मयताचे नाव आहे. ते आज दुपारी दोन वाजेच्या सुमारात रानमसले येथे झाडाच्या फांद्या तोडत होते. त्यावेळी हा प्रकार घडला. त्यांना वडाळा येथे प्राथमिक उपचार करून बेशुद्धावस्थेत सुधीर (भाऊ) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापुर्वी मरण पावले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# क वर्गातील १५ सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

**३० ऑक्टोबर रोजी होणार मतदान**

✔ सुराज्य/सोलापूर

### असा आहे कार्यक्रम

६ ते २० ऑक्टोबर २०२२ दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल आणि माघारी घेता येणार आहे. २१ ऑक्टोबर २०२२ रोजी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी व निशाणी वाटप, ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान आणि मतमोजणी लगेच होणार आहे.

दि.लक्ष्मी को-ऑप. बँक सेवकांची सहकारी पतसंस्था, नेताजी सर्व व्यवसायी ग्राहक सहकारी संस्था, सिद्धेश्वर साखर कारखाना सेवक पतसंस्था आदी १५ संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत, अशी माहिती उपनिबंधक कुंदन भोळे यांनी दिली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहकारी संस्थांच्या निवडणुकीवरील बंदी उठली आहे. याचाच एक भाग म्हणून उपनिबंधक कार्यालयाने शहर व जिल्ह्यातील क वर्गातील सहकारी संस्थांचा सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये दि. लक्ष्मी को-ऑप. बँक सेवकांची सहकारी पतसंस्था, नेताजी सर्व व्यवसायी ग्राहक सहकारी संस्था, विनायक सर्व व्यवसायी सहकारी ग्राहक संस्था, उज्ज्वला महिला सर्व व्यवसायी ग्राहक संस्था, सिद्धेश्वर साखर कारखाना सेवक पतसंस्था, रूपाली महिला विविध कार्य ग्राहक सहकारी संस्था, सुप्रभात सर्व व्यवसायी ग्राहक संस्था, मधू सर्व व्यवसाय ग्राहक सहकारी संस्था, सुनिता सर्व व्यवसाय ग्राहक सं. म., विद्याचरण सर्व व्यवसाय ग्राहक संस्था, माता कनकदुर्गा महिला ग्राहक संस्था, सोलापूर दूरसंचार कर्मचारी सहकारी पतसंस्था, सोलापूर जिल्हा कोतवाल कर्मचारी सहकारी पतसंस्था आणि जुळे सोलापूर नागरी सहकारी पतसंस्था यांचा समावेश आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



थांब थांब, आता मी आलोय!!


कल्याण

450-99-379


# विस्तवाशी खेळण्याचा मोह नाही आवरत

## ■ विनोदवीर आमदाराने बारामतीकरांवर डागली तोफ

✔ सुराज्य/सोलापूर



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील विनोदवीर ठरलेले आमदार शहाजीबापू पाटील यांनी शनिवारी बारामतीकरांवर तुफान फटकेबाजी केली. वाकीशिवणी येथील एका कार्यक्रमात काका-पुतण्यावर तोफ डागत असतानाच शहाजीबापूंना शरद पवारांवर टीका न करण्याचे आवाहन एका नेत्याने केले. पण त्यानंतर त्यांचे पित्त चांगलेच खवळले. माझा जन्म मुळीच चुलीजवळ झाला आहे. त्यामुळे विस्तवाशी खेळण्याचा मोह मला नाही आवरत, असे म्हणताच हास्याची लाट उसळली. झाले असे की- सांगोला तालुक्यातील वाकी शिवणे येथील धाराशिव साखर कारखान्याच्या गाळप हंगामाचा प्रारंभ शनिवारी शहाजीबापूंच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी पवार यांच्यावर निशाणा साधला.

त्याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दीपक साळुंखे यांनी आमदार पाटील यांना यापुढे जपून बोलावे. शक्यतो शरद पवारांवर टीका न करण्याचे आवाहन केले. त्यानंतर पुढे जाऊन शहाजीबापू म्हणाले की- माझा जन्मच चुलीजवळ झाला आहे. त्यामुळे मला विस्तवाशी खेळण्याचा मोह आवरत नाही. पंढरपूर येथील विठ्ठल कारखान्यावर पवार आले होते. त्यावेळी शरद पवार यांच्या पायापुढे चपल्या काढून ठेवायचो. तरीही पवार काका पुतण्यांनी राजकारणात २० वर्ष मला कोंडून ठेवले. यांचे साक्षीदार माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे आहेत. राजकारणात पवारांनी माझे एकप्रकारे राजकीयदृष्ट्या खच्चीकरण केले.



## ■ आधी बोलले, नंतर दैवत मानले

दीपक साळुंखे यांनी विधानसभा निवडणुकीत शेकाप उमेदवाराच्या विरोधात जाऊन शहाजीबापू यांना मदत केली होती. त्यामुळे साळुंखे यांनी त्यांना शरद पवार यांच्यावर टीका न करण्याचे आवाहन केले. तरीही त्यांनी आपल्या माणदेशी शैलीमध्ये पवारांचा समाचार घेतला. नंतर मात्र त्यांनी सारवासारव करत शरद पवार माझे दैवत आहेत, यापुढे त्यांच्या विषयी बोलणार नाही, अशी स्पष्टोक्ती केली. या वेळी विठ्ठल साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील, उपाध्यक्ष प्रेमलता रोंगे, संचालक धनंजय काळे, दिनकर चव्हाण, हणमंत पाटील आदी उपस्थित होते. सांगोला कारखान्याच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळीसाठी अभिजीत पाटील यांनी दोनशे रुपयांचा हप्ता या वेळी जाहीर केला..

## ■ राग अजूनही डोक्यात...

सांगोल्यात प्रत्येक वेळी पवार यांनी शहाजीबापूंच्या विरोधात शेकापला पाठिंबा देत राहिल्याने शहाजीबापू यांची राजकीय कोंडी होत होती. पवारांच्या मदतीमुळे शेकापचे गणपतराव देशमुख विजयी होत आणि शहाजीबापू पराभूत होत असत. आपल्या राजकीय वनवासाला शरद पवार आणि अजित पवार हे दोघेच जबाबदार असल्याचा राग शहाजीबापू पाटील यांच्या डोक्यात कायम आहे. त्यामुळेच पवारांवर टीका करणे बंद करा म्हंटल्यावर पवार काका पुतण्याने २० वर्षे मला घरात डांबून ठेवले आणि आता मला त्यांच्यावर बोलू नका असं हा म्हणतोय, असं म्हणत पाटील यांनी जोरदार टोलेबाजी केली.